प्रभावी संवाद पद्धती

१. मुलाशी बोलताना त्याच्या समोर उभे रहा आणि डोळ्यात पाहून बोला

२. मुलांचे लक्ष वेधून घ्या (अटेंशन)

उदारणार्थ : -
त्याला नावाने हाक मारा-

"ऐक" याचा दृश्य संके त (Visual Cue) दाखवा – जसं कानावर हात ठेवलेली चिन्ह

हातात खेळण्यासाठी काही सॉफ्ट किंवा हलकं खेळणं, जे मूल शांत होण्यासाठी वापरू शकेल पण सूचना देताना ती त्याच्या नजरेपासून दूर ठेवा

३. त्याला कळेल अशी भाषा वापरा म्हणून स्वतःच्या बोलण्याकडे लक्ष द्या

- लहान व सोपी वाक्ये वापरा.
- वाक्ये आणि शब्द वारंवार सांगत रहा.
- त्या शब्दांना हातवारे(सांकेतिक भाषा) वापरून समजवा
- सतत प्रश्न विचारण्यापेक्षा टिप्पणी करा
- मुलाची स्तुती करताना ठरलेले शब्द वापरा
- मूल विचार करू शकेल एवढा वेळ द्या. बोलणं समजायला आणि उत्तर द्यायला थोडा वेळ देणं गरजेचं आहे.



४. तुम्हाला तुमच्या मुलासोबत खेळायला वेळ मिळतो का?

मुलासाठी खेळाची जागा तयार करा

- आरामदायक आणि शांत कोपरा निवडा
- सव खेळणी एकाच बॉक्स मध्ये असावीत.
- संवेदनक्षम खेळ (Sensory Play) प्रोत्साहन द्या, जसं वाळूचा खड्डा, मऊ खेळणं, प्ले डोह (play dough)कणीक मळणे.
- तुमच्या मुलाला बॉक्समधून एक किंवा दोन खेळणी काढण्यासाठी प्रेरित करा.

OWL पद्धती वापरा

निरीक्षण

मुलाच्या गरजा, त्याचं लक्ष कुठे आहे, चेहऱ्यावरचे भाव आणि शरीराची हालचाल याकडे शांतपणे लक्ष द्या. उदाहरणार्थ: मुलं कधी खूप उत्साहात असतात, तर कधी गोंधळलेली वाटतात – हे ओळखणं महत्त्वाचं आहे.

थांबा

मुलाला स्वतःहून बोलू द्या किंवा कृती करू द्या. आपण पटकन उत्तर देऊ नये किंवा सतत सूचना देऊ नये. विशेषतः खेळताना – वारंवार सूचना किंवा प्रश्न टाळा. मुलाला त्याचा वेळ आणि स्पेस द्या, त्यातून संवाद सहज वाढतो.

ऐका

मुलाचं बोलणं शांतपणे, लक्षपूर्वक ऐका. त्याला पूर्ण लक्ष द्या – मोबाईल, टीव्ही बाजूला ठेवा. असं केल्यामुळे मुलाला सुरक्षित वाटतं आणि तो/ती तुमच्याशी मोकळेपणाने संवाद साधतो.

संयुक्त सहभाग

मुलाच्या खेळामध्ये सहभागी व्हा – त्याचं अनुकरण करा.
उदाहरणार्थ: जर मुलगा गाडी डोक्यावर फिरवत असेल, तर तुम्हीही गाडी डोक्यावर फिरवा!
त्याला बघा – तो हसतो का, पुन्हा करतं का, तुम्हाला बघून नवीन काही करतो का?
ही पद्धत तुमच्यात आणि मुलात मजेदार, जवळचा संवाद निर्माण करते!

स्पष्ट बोला, संवाद करताना ठराविक शब्द वापरा.

नेहमी 'हे काय आहे?' असं विचारण्याऐवजी, 'ते काय करत आहेत' किंवा 'त्याचं काय सुरू आहे' हे सांगून दाखवा.
असं केल्याने मूल फक्त ऐकत नाही, तर पाहतं, समजतं आणि शिकतं!
अरे बघ, कार फिरतेय... फिरतेय, फिरतेय... व्वा!
(यामुळे 'कार', 'फिरतेय' हे शब्द लक्षात राहतात आणि मुलं आनंदाने शिकतात.)

खेळ संपल्यावर – गोष्टी आवरायला शिकवा.

खेळ संपल्यावर हातवारे करून किंवा चित्र दाखवून मुलाला "झालं आता!" हे स्पष्ट सांगा. मग हळूहळू त्याला खेळणी परत जागेवर ठेवायला प्रोत्साहित करा.
उदाहरण:
"आता झालं! चला, आपण सगळी खेळणी बॉक्समध्ये ठेवूया. चल, मदत करूया!



Nayi Disha
inform · connect · empower
Where Hope Meets Courage

Copyright 2022